**रयत शिक्षण संस्थेचे,**

**चंद्राबाई - शांताप्पा शेंडुरे कॉलेज, हुपरी**

**व आप्पासाहेब नाईक (दादा) पैसाफ़ंड शेतकी सहकारी बँक लि.हुपरी**

**यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित**

**थोर स्वातंत्र्यसेनानी एल.वाय.पाटील राज्यस्तरीय आंतरमहाविद्यालयीन**

**वक्तृत्व स्पर्धा -2024-25 Date: 14/02/2025**

**Elocution competition Report**

मराठी राजभाषा दिनाचे औचित्य साधून सालाबादप्रमाणे आय.क्यू .ए सी व भाषा विभागाच्या वतीने थोर स्वातंत्र्यसेनानी, गांधीवादी विचारवंत एल.वाय.पाटील राज्यस्तरीय आंतरमहाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन शुक्रवार दि. १४. फेब्रु.२०२५ रोजी आप्पासाहेब नाईक (दादा) पैसाफंड शेतकी सहकारी बँक, लि हुपरी यांच्या आर्थिक सहकार्यातून महाविद्यालयांत करण्यात आले.

या स्पर्धेचे उदघाटन मान.. शिवराज नाईक,कार्यकारी संचालक, आप्पासाहेब नाईक (दादा) पैसाफंड शेतकी सहकारी बँक, लि हुपरी यांच्या हस्ते करण्यात आले.यावेळी बँकेचे चेअरमन मान अण्णासाहेब भोजे, महाविद्यालय विकास समिती सदस्य मान मानसिंगराव देसाई,अजित पाटील, रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी सदस्य मान. राहुल इंग्रोळे,यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ विजय पाडळकर हे होते.तर समारोपाचे प्रमुख पाहुणे मान. प्रा.डॉ.संभाजी गावडे (एस.जी.एम. कॉलेज,कराड)हे होते.एल.वाय.पाटील राज्यस्तरीय आंतरमहाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्ध्येमध्ये विविध महाविद्यालयातील सुमारे २५ स्पर्धकांनी सहभाग घेतला.

सदर स्पर्धेचे संयोजक मराठी विभाग प्रमुख प्रा. बाळकृष्ण जाधव, सह-संयोजक हिंदी विभाग प्रमुख प्रा. एम.एस.मुजावर यांनी काम पाहिले.परीक्षक म्हणून प्रा. डॉ एकनाथ पाटील,(अण्णासाहेब डांगे महाविद्यालय,हातकणंगले.)व प्रवीण चौगुले (कमला कॉलेज,कोल्हापूर)उपस्थित होते. स्पर्धा संयोजनासाठी प्रा. डॉ संध्या माने, प्रा.सौरभ कांबळे, प्रा. आदित्य बिल्लेप्रा.बी एस लोखंडे,प्रा दीपक जनवाडे,प्रा कपिल काशीद, प्रा.तृप्ती शिंदे प्रा.डॉ.एम एल सोनटक्के इत्यादी शिक्षक व शिक्षकेतर सेवकांचे सहकार्य लाभले तर आय.क्यू ए सी समन्वयक प्रा.देवल तुळसीकट्टी व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ विजय पाडळकर यांचे मार्गदर्शन लाभले.या स्पर्धेचा लाभ हुपरी पंचक्रोशीतील नागरिक,महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी घेतला

प्राचार्य
चंद्राबाई-शांताप्पा शेंडुरे कॉलेज.
हुपरी.

संयोजक
प्रा. बाळकृष्ण जाधव